# संवर्धनाला चालना



**गुरुदास नूलकर**
पर्यावरण अर्थशास्त्राचे अभ्यासक

## पर्यावरण



**पर्यावरण क्षेत्रासाठी सरकारने काही चांगल्या घोषणा जाहीर केल्या आहेत. पर्यावरणाचा विकास करताना पर्यटनालाही बळ मिळावे, यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसते. मात्र, जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना पर्यावरणासाठी त्याचा वापर हव्या तितक्या प्रमाणात होताना दिसत नाही.**

### ठळक तरतुदी

- पर्यावरण मंत्रालयासाठी ३,७५९ कोटी रुपयांची तरतूद
- 'कार्बन कॅप्चर'चा वापर करण्यासाठी २० हजार कोटी रुपये.
- गंगा योजनेवर खर्च होत असूनही सुधारणा नाही
- पर्यटन मार्गांची घोषणा नावीन्यपूर्ण
- कासव मार्ग आणि 'बिग कॅट समिट'ची घोषणा

मागील काही वर्षांपासून भारताला हवामान बदलाचा सामना करण्याचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. पूर, दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटा दरवर्षी लाखो लोकांचे जीवन विस्कळीत करत आहेत. अशा वेळेस अर्थसंकल्पातून पर्यावरणविषयक समस्यांची किती दखल घेतली आहे, ते पाहू.

कार्बन कॅप्चर, साठवण आणि उपयोगासाठी (सीसीयूएस) तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी सरकारने २०,००० कोटी रुपयांची तरतूद पाच वर्षांच्या कालावधीसाठी केली आहे. भारत जगातील तिसरा सर्वांत मोठा उत्सर्जक असल्यामुळे या योजनेला विशेष महत्त्व आहे. या निधीचा उद्देश खासगी गुंतवणूक आकर्षित करून स्टील आणि सिमेंट उद्योगातील उत्सर्जन कमी करणे आहे. औद्योगिक कार्बन डायऑक्साइड पकडून त्याचा वापर इंधन किंवा खत उत्पादनासाठी करता येतो. भारताने २०७० पर्यंत 'निव्वळ-शून्य' उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी, उपलब्ध तंत्रज्ञान व्यावसायिक स्तरावर आणण्यासाठी हा निधी महत्त्वाचा ठरेल. पकडलेल्या औद्योगिक कार्बन डायऑक्साइडचा उपयोग इंधन किंवा खत उत्पादनासाठी करता येऊ शकतो.

'नॅशनल गंगा' योजनेवर गेल्या वर्षी २,६८७ कोटी रुपये खर्च झाला आणि यावर्षी ३,१०० कोटी रुपये तरतूद आहे. पण अजून गंगेच्या पाण्याची स्थिती सुधारल्याचे जाणवत नाही. नदी जोड प्रकल्पासाठी १,९०६ कोटी रुपये आहेत. पर्यावरणपूरक पर्यटन मार्ग करण्याची घोषणा नावीन्यपूर्ण आहे. यामध्ये हिमालयीन परिसंस्थांचे संरक्षण करण्यासाठी हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये पर्वतीय मार्ग विकसित केले जातील. पण त्याचे स्वरूप काय आहे ते समजण्यासाठी धीर धरावा लागेल. सागरी कासवांच्या घरट्यांचे संरक्षण करण्यासाठी आणि किनारी पर्यावरण पर्यटनाला चालना देण्यासाठी ओडिशा आणि केरळमध्ये कासव मार्ग (टर्टल ट्रेल्स) स्थापन करण्यात येतील. २०२६ साली भारतात पहिले जागतिक 'बिग कॅट समिट'चे आयोजन केले जाईल. त्यात ९५ देशांचे प्रतिनिधी सहभागी होतील. मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी ५०० जलाशय आणि अमृत सरोवरे तयार करण्याच्या योजनांची घोषणाही करण्यात आली आहे.



पर्यावरण मंत्रालयासाठी मागील वर्षीपेक्षा २७७ कोटींनी अधिक, म्हणजे एकूण ३,७५९ कोटी रुपयांची तरतूद आहे. वनक्षेत्र वाढविण्यासाठी आणि वनजमिनीच्या संरक्षणासाठी हरित भारत अभियानात १७० कोटी रुपयांची तरतूद आहे. दरवर्षी वनक्षेत्रात लागणाऱ्या आगी आणि वणव्यांच्या संख्येत वाढ होत चालली असली तरी, वणवे प्रतिबंधक व्यवस्थापनासाठी ४० कोटी रुपये, म्हणजे मागील वर्षीपेक्षा फक्त ६.५ कोटी रुपयेच अधिकची तरतूद आहे. नैसर्गिक संसाधने आणि परिसंस्थेचे संवर्धन करण्यासाठी बायोस्फिअर, पाणथळ जागा आणि तलाव संवर्धनाचे प्रयत्न सुरू आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी १,०९१ कोटी आणि हरित भारत मिशनसाठी १७० कोटी तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये जैवविविधता संवर्धनासाठी १० कोटी रुपये आणि वन्यजीव अधिवास संवर्धनासाठी ४०४ कोटींची तरतूद आहे. मात्र, मागील वर्षीच्या २६५ कोटींच्या खर्चाचा विनियोग कसा झाला आणि त्यातून प्रत्यक्षात काय परिणाम झाला, याची नोंद घेण्यात आलेली नाही. वन्यजीव शेतात शिरून भारतभर शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर गदा येत आहे, त्यासाठी केंद्र पातळीवर प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानासाठी विशेष तरतूद करणे गरजेचे होते. पण त्यावर कोणताही विचार झालेला नाही.

रेटिंग ●●●●●●